# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## (नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)

**जनसंपर्क विभाग**

---

## कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार नामांकनाकरीता आवेदनपत्र आमंत्रित

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्फे आणि दानदाते स्व.श्री द.ना. उपाख्य बबनदादा मेटकर यांचेकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ श्री संत गाडगेबाबा सामाजिक कार्य पुरस्कार यावर्षी प्रदान करावयाचा आहे.

श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार महाराष्ट्र राज्यातील श्री संत गाडगेबाबांच्या विचारानुसार सामाजिक कार्य करणारी व्यक्ती किंवा संस्थेला देण्यात येतो. पुरस्कारासाठी एखाद्या व्यक्तीने/संस्थेने स्वतःहून नाव सादर करणे किंवा दुस-या कोण्या एखाद्या व्यक्तीची /संस्थेची पुरस्कारासाठी शिफारस करणे किंवा नाव सूचविणे दोन्ही पध्दतीने नामांकन अर्ज स्वीकारण्यात येतील. संस्था किंवा व्यक्तीगत आवेदकांनी नामांकन आवेदन पत्रामधील संपूर्ण माहिती भरुन त्याच्या पुरावार्थ माहिती जोडणे आवश्यक आहे.

श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कारासाठी आवेदकांनी दिनांक ३० सप्टेंबर,२०१९ पूर्वी विहीत प्रपत्रातील नामांकन आवेदनपत्र पांच प्रतीत "कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ", अमरावती - ४४४६०२ या पत्त्यावर पाठवावीत. नामांकन आवेदनपत्र पाठवितांना लिफाप्यावर **" कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार"** नामांकनाकरीता आवेदनपत्र असे ठळक अक्षरात लिहावे. विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर सदर नामांकन आवेदनपत्राचा विहीत प्रपत्रात नमूना देण्यात आला आहे. विद्यापीठाव्दारे संकेतस्थळावर दिलेल्या नामांकन आवेदनपत्रानुसार ए-फोर साईज मधीलच संगणकीय नामांकन आवेदनपत्र स्वीकारण्यात येईल. विना प्रपत्र पाठविलेला अर्ज रद्द करण्यात येईल, याची दक्षता संबंधितांना घ्यावयाची आहे. यापूर्वी अनेक मान्यवर व्यक्तींना हा पुरस्कार देवून विद्यापीठाद्वारे सन्मानित करण्यात आले आहे.

सन २०१९ चा पुरस्कार प्राप्त करण्यास इच्छूक व्यक्तींनी अथवा संस्थांनी विद्यापीठाचे www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर 'डाऊनलोड' या शिर्षांतर्गत 'अवार्ड अचिव्हमेन्ट' यामधील विहीत प्रपत्रातील नामांकन आवेदनपत्र विद्यापीठाकडे पाठवावे, असे विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी कळविले आहे.

---

प्रति,

मा.संपादक/जिल्हा प्रतिनिधी,

दै. ...........................

अमरावती.

कृपया सोबतचे वृत्त आपल्या लोकप्रिय दैनिकात सविस्तर प्रकाशित करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग**
दि. १८/०७/२०१९.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी